for more materials visit www.educationobserver.com/forum

**Series SKS**

कोड नं. **9**
Code No.

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थी कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ **5** हैं ।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए कोड नम्बर को छात्र उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें ।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में **8** प्रश्न हैं ।
- **कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें ।**
- इस प्रश्न-पत्र को पढ़ने के लिए 15 मिनट का समय दिया गया है । प्रश्न-पत्र का वितरण पूर्वाह्न में 10.15 बजे किया जायेगा । 10.15 बजे से 10.30 बजे तक छात्र केवल प्रश्न-पत्र को पढ़ेंगे और इस अवधि के दौरान वे उत्तर-पुस्तिका पर कोई उत्तर नहीं लिखेंगे ।
- Please check that this question paper contains **5** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **8** questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minutes time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*निर्धारित समय : 3 घण्टे*
*Time allowed : 3 hours*

*अधिकतम अंक : 100*
*Maximum Marks : 100*

for more materials visit www.educationobserver.com/forum

## SECTION A – (Grammar)

1. पुढील वाक्ये कंसांतील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहा (कोणतीही ***पाच***) : 15

   (i) ललिता वर्तमानपत्र वाचत आहे. (भूतकाळ करा.)

   (ii) विमल स्वयंपाक करते. (कर्मणी करा.)

   (iii) तू ही चार पाने लिहून काढलीस. (आज्ञार्थ करा.)

   (iv) तिने मला फोन केला. (कर्तरी करा.)

   (v) सर्वजण वर्गात चुपचाप बसतात. (विध्यर्थ करा.)

   (vi) आम्ही चहाबरोबर चिवडा खातो. (भविष्यकाळ करा.)

   (vii) विज्ञानाच्या बळावर माणसाने निसर्गावर मात केली. (वर्तमानकाळ करा.)

2. (अ) वचन बदला : 2

   (i) घोडा

   (ii) जाळे

   (ब) क्रिया-विशेषण बनवा : 3

   (i) दुपार

   (ii) जोर

   (iii) हलका

3. खालीलपैकी ***पाच*** वाक्यांमध्ये कंसांतील शब्दांची योग्य रूपे वापरून ती वाक्ये लिहा : 5

   (i) तो अगदी आतल्या (गाठ) आहे.

   (ii) बाळाचे रडणे ऐकून (आई) पान्हा फुटला.

   (iii) (तो) कपडे खूप मळले आहेत.

   (iv) दूर टेकडीवरच्या म्हशी सुंदर (दिसणे).

   (v) मिरवणुकीतील ध्वनिवर्धकांमुळे आमच्या घरातील (शांतता) वाट लागली.

   (vi) त्याने ते अंतर अर्ध्या (तास) पार केले.

   (vii) त्याला त्या कार्यक्रमात गाणे (म्हणणे) होते.

for more materials visit www.educationobserver.com/forum

## SECTION B

**4.** खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :

भाषा ही मानवाच्या सामाजिक अस्तित्वाची खूण आहे. पृथ्वीवर अनंत प्राणिमात्र आहेत; पण त्यांना मानवासारखा सामाजिक-सांस्कृतिक इतिहास नाही. याचे कारण त्यांच्यापाशी मानवासारखी भाषा नाही. सामाजिक व्यवहाराचे माध्यम, भावनिक ऐक्याचे प्रतीक, सूक्ष्मातिसूक्ष्म ज्ञानव्यवहार पेलण्याची क्षमता, सृष्टी आणि मानव यांच्यातील आंतरिक देवघेव, कलांचे द्रव्य अशा अनेक पातळ्यांवर मानवाला भाषेवरच विसंबून रहावे लागते. भाषेखेरीज संस्कृती अस्तित्वात येऊ शकत नाही. माणसाची अनुभव घेण्याची प्रक्रिया, त्यापाठीमागील त्याचा दृष्टिकोण आणि त्याची अभिरुची या सर्वांच्या खुणा भाषेत आढळतात. भाषा ही मूलतः एक सामाजिक प्रक्रिया असल्यामुळे माणसाच्या सांस्कृतिक इतिहासातील स्थित्यंतरांचा आलेख भाषेच्या अध्ययनातून मांडता येऊ शकतो. भाषा आणि समाज यांतील परस्परसंबंध अतिशय घनिष्ठ असतात. त्यामुळे बोलणाऱ्या व्यक्तीच्या भाषेतून समाजच प्रगट होतो. एकदा विधिमंडळात 'अर्थव्यवस्था कुंठित झाली आहे' या विषयावर दोन आमदार मतप्रतिपादन करीत होते. पहिला आमदार म्हणाला, "आपल्या अर्थव्यवस्थेचं विमान रनवे वरच फिरतंय. या सरकारच्या हयातीत ते रनवेवरून उड्डाण करू शकेल, असे दिसत नाही." दुसरा आमदार म्हणाला, "आपल्या अर्थव्यवस्थेचा गाडा चिखलात रुतून पडला आहे; आणि दिवसेंदिवस तो अधिकच गाळात खोल चालला आहे." दोन्ही आमदारांच्या भाषेवरूनच त्यांची सामाजिक परिस्थिती लक्षात येते. पहिला आमदार शहरी व मध्यमवर्गीय आहे तर दुसरा ग्रामीण भागातला आहे, हे सहज लक्षात येते. माणसाचा एकंदर भाषिक व्यवहार सामाजिक पर्यावरणातच होत असतो. समाजीकरणाच्या प्रक्रियेतच व्यक्ती भाषा शिकत असते.

(i) पृथ्वीवरील इतर प्राण्यांना मानवासारखा इतिहास का नाही ? *2*

(ii) भाषेमध्ये मानवाच्या व्यक्तित्वाच्या कोणकोणत्या खुणा आढळतात ? *2*

(iii) व्यक्तीचे बोलणे त्याच्या भोवतालच्या समाजाशी कसे संबद्ध असते ? *2*

(iv) पहिला आमदार शहरी भागातला आहे, हे कशावरून ? *2*

(v) दुसऱ्या आमदाराचे सामाजिक पर्यावरण त्याच्या भाषेतून कसे लक्षात येते ? *2*

for more materials visit www.educationobserver.com/forum

## SECTION C

5. पुढीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर सुमारे 250 ते 300 शब्दांत निबंध लिहा : *15*

(i) रस्त्यातील वाहतुकीची कोंडी

(ii) संगणकाचे फायदे व तोटे

(iii) अपुऱ्या पर्जन्याचे संकट

## SECTION D – (Literature)

6. (अ) खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *10*

(i) तानूच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

(ii) महात्मा फुले यांच्या डोक्यात कोणकोणते विचार उसळले होते ?

(iii) ऑडिटरने कोणते आक्षेप घेतले आणि त्याला छत्रपती शाहू महाराजांनी कोणते उत्तर दिले ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा : *10*

(i) "माझा अंदाज खरा ठरला म्हणायचा !"

(ii) "असे म्हणण्यात आपली प्राचीन संस्कृती कमी प्रतीची होती असे मला मुळीच सुचवायचे नाही."

(iii) "भाषा ही समाजपुरुषाच्या जीवनाला चेतना देणाऱ्या रक्तासारखी आहे."

7. (अ) खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा : *10*

(i) "पण चिमुकल्या डोळ्यांत
हिंस्रतेचा आविर्भाव पाहून,
हातातली खोटी बंदूक
कधीही खरी होण्याची भीती
मेंदूत आरपार घुसत गेली"

(ii) "चुकली तालात चाल, लागला जिवास बोल
ढळलेला तोल सावरीत चाललो"

(iii) "आणि स्वीकाराच्या दिशेनंच
मोजावं लागेल
तुझ्या जमीन-अस्मानातलं अफाट अंतर"

9

for more materials visit www.educationobserver.com/forum

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** अवतरणांतील अलंकार ओळखा : *5*

(i) “हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि का शिरी ?
मठाची उठाठेव का तरी ?”

(ii) “दूर नभाच्या पल्याड आहे उभा कुणी श्रीरंग
उधळित पिंजर तरल धुक्याची...
झाडांवरती रंग”

(iii) “खांद्यावर बाळगिले ओझे सुखदुःखाचे
फेकुन देऊन अता परत चाललो !”

**8.** (अ) ‘माणसाची गोष्ट’ या कथेत “माणसाला शिक्षा व्हायला हवी” असे लेखिका का म्हणते ? तुम्हाला ते पटते का ? *10*

**किंवा**

नर्मदा कोणत्या कारणामुळे अस्वस्थ होती ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : *5*

(i) स्वैपाकाच्या बाई राजा कुत्र्याशी कशा प्रकारे वागत ?

(ii) बुवाच्या मनोवृत्तीत कशा प्रकारे बदल झाला ?

(iii) ‘त्याग’ या कथेत लेखिकेचे मन कोणकोणत्या विचारांनी हादरून गेले आहे ?